# प्रकरण - सहावे

# सारांश, निष्कर्ष, शिफारशी

# प्रकरण - सहावे
# सारांश, निष्कर्ष, शिफारशी

## ६.१) प्रस्तावना :

प्रस्तुत समस्येचा अभ्यास सहा प्रकरणात विभागला आहे. पाचव्या प्रकरणामध्ये संशोधकाने संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण केले आहे. या प्रकरणामध्ये संशोधनाचा सारांश, निघालेले निष्कर्ष, केलेल्या शिफारशी मांडल्या आहेत.

सर्जनशीलता विकासाच्या पध्दतीमध्ये बुध्दीमंथन, (Brain storming) भिन्नान्वयन(Synecties), गुणधर्म सूचीकरण(Attribute Listing), संरचना विश्लेषण(Morphological), पडताळा सूची(check list), भूमिकाभिनय पध्दती(Role playing Method) या पध्दतीचा वापर केला जातो. यापैकी भिन्नान्वयन या पद्धतीचा विल्यम गॉर्डन हा जनक आहे. गॉर्डनच्या शब्दात Synectics चा अर्थ Joining together different and apparently असा होतो. सकृतदर्शनी वेगळ्या विसदृश किंवा विसंगत वाटणाऱ्या / दिसणाऱ्या घटकांचा संबंध जोडणे ही यातील संकल्पना.

**भिन्नान्वयन पध्दतीला आधारभूत म्हणून गॉर्डनने खालील गृहीतके मांडली आहेत :-**

१) सर्जनशील- प्रक्रिया ही अलौकिक, गूढ, अनाकलनीय अशी प्रक्रिया नव्हे. तिचे स्वरूप समजून घेता येते, स्पष्ट करून सांगता येते. सर्जनशील व्यक्तीने आपल्या सर्जनशील निर्मिती-प्रक्रियेचे स्वरूप समून घेण्याचा प्रयत्न केल्यास तो तिच्या निर्मितीला प्रतिबंधक ठरत नाही. उलट, हे स्वरूप जर तिला समजले तर तिच्या सर्जनशील कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होऊन ती सर्जनशील निर्मितीस उपकारक ठरते.

२) सर्जनशील निर्मिती ही कलेच्या क्षेत्रापुरतीच मर्यादीत नाही. कला व विज्ञान या दोन्ही क्षेत्रातील संशोधन व नवनिर्मिती यात मुलभूत फरक नाही त्यांच्या मुळाशी असलेली सर्जनशील व मान्नसिक प्रक्रिया सारखीच असते.

३) सर्जनशील निर्मिती ही केवळ व्यक्तिगत प्रक्रिया नव्हे, सामूहिक पातळीवरही ती घडू शकते व दोन्ही पातळीवरील प्रक्रियांचे स्वरूप सारखेच असते.

४) सर्जनशील प्रक्रियेत बुध्दीपेक्षा भावनेला व विचारांपेक्षा अविचाराला किंवा तार्किकतेपेक्षा अतार्किकतेला अधिक महत्त्व असते.

५) समस्या-निराकरणाचे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी मानसिक प्रक्रियेतील या भावनात्मक व अतार्किक अंगाची- आकलन आवश्यक असते.

वरील गृहीतकांच्या आधारावर ब्रुस जॉयस या अमेरीकन शिक्षणतज्ज्ञाने सर्जनात्मक विकास प्रतिमान या तंत्राचा विकास केला. सदर संशोधनात संशोधकाने प्रायोगिक मात्रेचा अवलंब करताना सर्जनात्मक विकास प्रतिमानाचा वापर करून निबंध लेखनात सर्जनात्मकता जोपासली. प्रचलित पध्दतीच्या तुलनेत सर्जनात्मक विकास प्रतिमानाची परिणामकता येथे संशोधकांनी अभ्यासली आहे.

## ६.२) सारांश-

### संशोधन समस्येचे शब्दांकन :

उच्च प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमातील मराठी लेखन क्षमतेत सर्जनात्मक विकास प्रतिमानाच्या परिणामकतेचा अभ्यास.

### संशोधनाची उद्दिष्टे-

उद्दिष्टे मांडताना सर्जनात्मक लेखन या प्रकारात निबंध प्रकार येतो. त्याला अनुसरून उद्दिष्टे मांडली आहेत. ज्या ठिकाणी सर्जनात्मक लेखन असा उल्लेख आहे त्या ठिकाणी सर्जनात्मक लेखन प्रकारापैकी निबंध हाच प्रकार अपेक्षित आहे असे मानावे.

१) सर्जनात्मक लेखनाच्या प्रचलित पध्दतीचा शोध घेणे.

२) सर्जनात्मक लेखनाच्या प्रचलित पध्दतीचा अभ्यास करून त्यातील कमतरतांचा अभ्यास करणे.

३) सर्जनात्मक लेखनाच्या प्रचलित पध्दतीतील कमतरता भरून काढण्यासाठी सर्जनात्मक विकास प्रतिमानाची उपयोगिता अभ्यासणे.

४) सर्जनात्मक विकास प्रतिमानाचा वापर करून इयत्ता ६वी व ७ वी तील विद्यार्थ्यांच्या सर्जनात्मक लेखन क्षमतेवर पडणारा परिणाम अंभ्यासणे.

५) इयत्ता ६ वी व इयत्ता ७वी तील विद्यार्थी वयोगटाचा सर्जनात्मक लेखन क्षमतेवर पडणारा परिणाम अभ्यासणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष उपमा निर्मितीची क्षमता विकसित करणे.

७) विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिगत उपमा निर्मितीची क्षमता विकसित करणे.

८) विद्यार्थ्यांमध्ये विरोधाभासी शब्द निर्मितीची क्षमता विकसित करणे.

**संशोधन परिकल्पना :**

वरील उदिद्ष्टांवर आधारित पुढील शून्य परिकल्पना मांडण्यात आलेल्या आहेत.

१) सर्जनात्मक विकास प्रतिमानाचा अध्यापनात वापर करून केलेले लेखन व प्रचलित पद्धतीचा अध्यापनात वापर करून केलेले लेखन यामधील गुणात सर्जनात्मक दृष्ट्या सार्थ फरक आढळत नाही.

२) इयत्ता ६वी व इयत्ता ७वी च्या विद्यार्थी वयोगटातील सर्जनात्मक लेखनातील गुणात सार्थ फरक आढळत नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा-**

**संशोधनाची व्याप्ती-**

१) सदर संशोधनासाठी संशोधकाने कुडाळ तालुक्यातील इयत्ता ६ वी व ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेल्या सर्वच्या सर्व २१ शाळा शिक्षक मुलाखतीसाठी व सर्वेक्षणासाठी निवडल्या आहेत.

२) संशोधकाने निबंध लेखनक्षमता या पूर्व घटकाच्या अनुषंगाने परामर्श घेतला आहे.

३) उच्च प्राथमिक स्तरावरील ६ वी व ७ वीच्या सर्व बौद्धिक पातळीवरील विद्यार्थ्यांचा संशोधनामध्ये (न्यादर्श निवडीमध्ये) विचार केलेला आहे.

४) सदर संशोधनात प्रायोगिक पध्दतीने निबंध लेखनाचे केलेले अध्यापन प्राथमिक स्तरावरील कोणताही शिक्षक माहितीपर मार्गदर्शन घेऊन अध्यापन करू शकतो.

**मर्यादा :**

१) हे संशोधन उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ६ वी व ७ वी विद्यार्थी वयोगटापुरतेच मर्यादीत आहे.

२) सदर संशोधन हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यापुरचे मर्यादीत आहे.

३) सदर संशोधन उच्च प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमातील मराठी लेखन क्षमतातील निबंध लेखन भागापुरतेच मर्यादीत आहे.

४) सदर संशोधन उच्च प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमाच्या माध्यमिक शाळांना जोडलेल्या वर्गापुरते मर्यादीत आहे.

**संशोधन पध्दती :**

संशोधकाने शैक्षणिक संशोधनाच्या विविध पध्दतीपैकी प्रचलित पध्दतीचा मागोवा घेण्यासाठी सर्वेक्षण व मुलाखतीचा उपयोग केला. सर्जनात्मक विकास प्रतिमानाची परिणामकता प्रचलित सर्जनात्मक लेखनाच्या तुलनेत अभ्यासावयाची असल्याने प्रायोगिक पध्दतीतील दोन समान गट अभिकल्पाचा वापर केला.

**नमुना निवड :**

कुडाळ तालुक्यात इयत्ता ६ वी व इयत्ता ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेल्या एकूण २१ शाळा आहेत. इयत्ता ६ वी मध्ये ७३२ मुले व ६१५ मुली मिळून १३४७ विद्यार्थी वरील २१ शाळांमध्ये आहेत. इयत्ता ७ वी मध्ये ७२० मुले व ६४६ मुली असून १३६६ विद्यार्थी वरील शाळांत शिक्षण घेत आहेत.

२१ शाळांपैकी २१ शाळातील ६ वी व ७ वी ला मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांची सर्वेक्षण प्रश्नावली व मुलाखतीसाठी निवड केली (१०० टक्के नमुना निवड) २१ शाळांपैकी यादृश्चिक पध्दतीने (लॉटरी पध्दतीने) ३ शाळा (१५ टक्के शाळा) निवडण्यात आल्या. या शाळांमधील ६ वी व ७ वीच्या एकूण २७७ विद्यार्थ्यांवर म्हणजेच(१०.२१ टक्के विद्यार्थी संख्या) प्रयोग करण्यात आला.

**संशोधनाची साधने :**

संशोधनात विविध प्रकारची माहिती व आकडेवारी जमा करण्यासाठी विविध साधने वापरली जातात. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने प्रचलित पध्दतीच्या निबंध लेखनाचे तंत्र अभ्यासण्यासाठी प्रश्नावली व मुलाखती (शिक्षकांसाठी) या साधनाचा वापर केला. प्रायोगिक व नियंत्रित गटांना अध्यापन केल्यानंतर घेतलेल्या पूर्व व अंतिम चाचणीचे मूल्यमापन म.बा.कुंडले, यांच्या 'A Test of Literary Creativity in Marathi' या प्रमाणित चाचणीद्वारे केले.

**संख्याशास्त्रीय विश्लेषण :**

संशोधकाने प्रायोगिक व नियंत्रित गटांना प्रमाणित चाचणीचे निकष लावून मूल्यमापन केले व मिळालेल्या संख्याशास्त्रीय माहितीला 't' परीक्षिका लावून विश्लेषण केले.

## ६.३) निष्कर्ष :

### ६.३ १)शिक्षक प्रश्नावलीतील माहितीवर काढलेले निष्कर्ष :

१) ९४.४५टक्के शिक्षकांच्या मते निबंध लेखनासाठी अध्यापन पध्दती / तंत्रे विकसित करण्याची गरज आहे.

२) ५४.५४टक्के शिक्षक वर्षातून २० ते २५ तासिका निबंध लेखनासाठी वापरतात.

३) बहुसंख्य शिक्षक पाठ्यपुस्तकाच्या व्यतिरिक्त विषय निवडतात.

४) ९५.४५टक्के शिक्षकांच्या मते विद्‌यार्थ्यांना निबंध लेखनामध्ये अडचणी येतात.

५) २५टक्के विद्यार्थी स्वत:च्या कल्पनेने निबंध लिहितात.

६) बहुसंख्य विद्यार्थी निबंध लेखनासाठी मार्गदर्शकाचा(गाईडचा) वापर करतात.(७२.७२टक्के विद्यार्थी) परंतु तो जशास तसा करीत नाहीत. मार्गदर्शकाचा वापर करून स्वत:च्या शब्दात निबंध लेखन करतात.

७) सर्वच्या सर्व शिक्षक (१००टक्के) प्रथम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून नंतर निबंध लिहून घेतात.

८) बहुसंख्य शिक्षक (७७.२७टक्के) निबंध प्रथम लिहिण्यास सांगून त्यात सुधारणा करण्यास सांगतात.

९) प्रथम मार्गदर्शन करून नंतर निबंध लिहिण्यास सांगणे ही पध्दत बहुसंख्य शिक्षकांना जास्त उपयुक्त वाटते.

१०) १००टक्केशिक्षक निबंधावर चर्चा करून नंतर निबंध लिहिण्यास सांगतात.

११) बहुसंख्य विद्यार्थी चर्चेत सहभागी होतात.

१२) ७२.७२टक्केशिक्षकांच्या मते निबंध लेखनात साचेबंदपणा आढ़ळतो.

१३) प्रथम निबंध लिहिण्यास सांगून त्यात सुधारणा करण्यास सांगण्याची पध्दत बहुसंख्य शिक्षकांना अधिक योग्य वाटते.

१४) १००टक्के शिक्षकांना निबंध लेखनातून सर्जनशीलतेचा विकास होतो असे वाटते.

### ६.३ २) शिक्षक मुलाखतीतून काढ़लेले निष्कर्ष :

१) बहुसंख्यशिक्षक प्रथम मार्गदर्शन करून निबंध कशा प्रकारे लिहावा, त्यात कोणते मुद्दे यावेत, सुरूवात ,मध्य,शेवट यावर भर देऊन मार्गदर्शन करतात. क्वचित प्रसंगी प्रथम निबंध लिहिण्यास सांगून त्यात सुधारणा करण्यास सांगतात. परंतु सदर पध्दतीत वेळ जास्त लागतो असे शिक्षकांचे मत आहे. स्वत:च्या मनाने लिहून नंतर मार्गदर्शन करण्याची पध्दत शिक्षकांना अधिक उपयुक्त वाटते. निबंधात म्हणी,वाक्प्रचार यावर अधिक भर दिला जातो. बहुदा शिक्षकांचे विचार मुले स्विकारतात व तशाच स्वरूपाचे लेखन करतात. शुध्दलेखन व हस्ताक्षर यावर विशेष लक्ष दिले जाते.

२) ९० टक्के निबंध बध्द स्वरूपाचे असतात. निबंधात लेखनशैली सुचविली जाते.

३) सर्वच्या सर्व शाळात १५ गुण निबंध + ८ गुण पत्रलेखन + ७ गुण गोष्ट + ५ गुण उताऱ्यावरील प्रश्न + १० गुण व्याकरण असे ५० टक्के गुण भाषिक गोष्टीवर (Lingustic item) असतात. तर ५० टक्के गुण आशयावर (Content) असतात.

४) ८० टक्के शिक्षकांच्या मते विद्यार्थी स्वत:च्या कल्पनेने निबंधलेखन करत नाहीत त्यामुळे त्यांना शिक्षकच मुद्दे सुचवितात व त्यावर आधारीत निबंधलेखन विद्यार्थी करतात. ९० टक्के निबंध शिक्षकाच्या अनुभवावर आधारित असतात.

५) निबंधाच्या मूल्यमापनामध्ये १००टक्के शिक्षक अक्षराला महत्त्व देतात. आरंभ,मध्य व शेवट या गोष्टींवर आधारीत मूल्यमापन केले जाते. म्हणी,सुभाषिते यांच्यावर आधारित ४० टक्के मूल्यमापन होते.

६) निबंधामध्ये शब्दप्रवाहित्व आढ़ळत नाही असे १०० टक्के शिक्षकांचे मत आहे. शब्दप्रवाहित्वावर निबंधात दुर्लक्ष केला जातो.

७) विरोधाभासी शब्द निबंधात आढळत नाही. असेतंत्र विकसित होणे आवश्यक आहे.

८) ५० टक्के विद्यार्थी निबंधात बोलीभाषेचा वापर करतात. त्यामुळे असे शब्द प्रमाणित करण्यास ७० टक्के शिक्षक सांगतात.

### ६.३.३ निष्कर्ष : (प्रायोगिक पध्दतीवरून)

१) सर्जनात्मक विकास प्रतिमानाचा वापर करून केलेले लेखन प्रचलित पध्दतीचा वापर करून केलेल्या लेखनापेक्षा सर्जनात्मक दृष्ट्या प्रभावी ठरते.

२) इयत्ता ६ वी व इयत्ता ७ वीच्या विद्यार्थी वयोगटातील सर्जनात्मक लेखनात कोणताही फरक आढळत नाही.

३) सर्जनात्मक विकास प्रतिमानाच्या वापरामुळे विद्यार्थीना प्रत्यक्ष उपमा निर्मितीची क्षमता विकसित होते.

४) सर्जनात्मक विकासप्रतिमानाच्या वापरामुळे विद्यार्थ्यात व्यक्तिगत उपमा निर्मितीची क्षमता विकसित होते.

५) सर्जनात्मक विकास प्रतिमानाच्या वापरामुळे विद्यार्थ्यांत विरोधाभासी शब्द निर्मितीची क्षमता विकसित होते.

६) सर्जनात्मक विकास प्रतिमानाच्या वापरामुळे सर्जनशीलतेतील शब्द प्रवाहित्व मौलिकता, लवचिकता या घटकांचा विशेष विकास होतो.

शिफारशी :

**अ) संशोधक मराठी विषयाच्या शिक्षकांना पुढील शिफारशी करतो.**

१) वर्षातून निबंध मार्गदर्शनाकरीता किमान २५ तासिका वापराव्यात.

२) वर्षातून आशयासाठी (Content) ५०% व भाषिक घटकाकरीता (Lingustic item) ५०% तासिका वापराव्यात.

३) निबंध लेखनासाठी मुक्त निबंध निवडावेत.

४) निबंध लेखनासाठी अध्यापनाच्या प्रतिमानांच्या तंत्राचा वापर करावा.

५) सर्जनात्मक विकास प्रतिमानाच्या तंत्राचा वापर करून अध्यापन करावे.

६) प्रत्यक्ष उपमा, व्यक्तिगत उपमा निर्मितीची क्षमता विद्यार्थ्यांत निर्माण करावी.

७) विद्यार्थ्यांना विरोधाभासी शब्द निबंधात वापरण्यास शिकवावे.

८) विद्यार्थ्यांच्या भाषिक प्रवाहित्वावर भर द्यावा.

९) विद्यार्थ्यांना ठराविक पध्दतीनेच/शैलीनेच निबंध लेखनाची सक्ती करणे शक्यतो टाळावे.

१०) निबंधाचे मूल्यमापन प्रचलित पध्दतीपेक्षा सर्जनात्मकतेच्या मुद्यांवर आधारित करावे.

११) विद्यार्थ्यांनी बोलीभाषेत लेखन कौशल्य जोपासल्यास त्यातही त्यांना प्रोत्साहन द्यावे.

१२) निबंधात एकाच आशयाचे विविध शब्द (समानार्थी शब्द) वापरण्यास प्रवृत्त करावे.

१३) विद्यार्थ्यांत सर्जनशीलता घटक वाढीस लागतील याकडे विशेष लक्ष द्यावे.

१४) विद्यार्थी सर्जनशील लेखन करू शकतात हा विश्वास आपणात निर्माण करावा.

**ब) संशोधक अभ्यासक्रम निर्मिती मंडळाला पुढील शिफारशी करतो**

१) अभ्यासक्रम तयार करताना मुक्त निबंधाना वाव देण्यावर अधिक भर ठेवावा.

२) निबंध मूल्यमापन निकषांमध्ये सुधारणा सुचविण्यास याव्यात

३) प्रमाणित भाषेबरोबरच बोलीभाषेचा विकास होईल यावर अधिक लक्ष द्यावे.

**पुढील संशोधनासाठी विषय :**

१) सर्जनात्मक विकास प्रतिमानाची परिणामकारकता कथापूर्ती, काव्यलेखन, संवादलेखन या लेखनातील इतर बाबी बाबत अभ्यासणे.

२) सर्जनात्मक विकास प्रतिमानाची परिणामकारकता दूरगामी स्वरूपात अभ्यासणे.

३) सर्जनात्मक विकास प्रतिमानाची परिणामकारकता विज्ञान विषयासंदर्भात अभ्यासणे.